2021-22
SMP

ISSN - 2279 - 0489

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

**Volume - X** **Issue - II** **February - July - 2022**

**English / Marathi Part - II**

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal No. 47100**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2020 - 6.538**
**www.sjifactor.com**

**❖ EDITOR ❖**

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

**❖ PUBLISHED BY ❖**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Political Impact and Socio-Economical Developmental Disparities in Divisions of Maharashtra<br>**R. B. Khandare**<br>**R. V. Maske**<br>**K. R. Lokhande** | 1-5 |
| 2 | Empowerment of Tribal Women in Melghat Region: Problems & Prospects<br>**Mr. Sachin G. Mahajan** | 6-14 |
| 3 | The Challenges Facing Higher Education in the Twenty-First Century<br>**Dr. Gokul Shamrao Damre** | 15-22 |
| 4 | Impact of Culture on English Language<br>**Dr. Vijay Dashrath Misal**<br>**Satish Bhimrao Meratkar** | 23-30 |
| 5 | Challenges to National Integration in India<br>**Vijay R. Gaikwad** | 31-33 |
| 6 | Remodeling Literature: A Glance on to the Digital Era<br>**Dr. Baiju Krishnan** | 34-36 |
| 7 | Dr. B. R. Ambedkar and Development of Electoral System in India<br>**Dr. Janardan K. Kamble** | 37-45 |
| 8 | India in the 21st Century - Achievements, Challenges and Progress<br>**Rameshwar B. Dusunge** | 46-50 |
| 9 | Importance of Balanced Diet and Proper Exercise for the Students<br>**Dr. Vaishali R. More** | 51-54 |
| 10 | The Contribution of Women in Freedom Movement of India<br>**Dr. Santosh Babare** | 55-59 |
| 11 | Use of Google Apps (Tools) for Effective Teaching & Learning in 21st Century<br>**Mr. Prakash U. Hanwate**<br>**Mr. Bhushan P. Sawale**<br>**Mr. Tulshiram C. Bhoyar** | 60-63 |
| 12 | Importance of Nutrition for Human Being<br>**Assit. Prof. Pallavi Rameshrao Deshmukh** | 64-67 |

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | नवभारताचे शिल्पकार : पंडित जवाहरलाला नेहरू<br>**प्रा. डॉ. पी. आर.जुनघरे** | १-५ |
| २ | नवीन शैक्षणिक धोरणावर जागतिकीकरणाचा प्रभाव<br>**डॉ. अतुल नारायण खोटे** | ६-१० |
| ३ | "बुर्गांट" एकविसाव्या शतकातील स्त्री समस्या प्रधान कादंबरीचे स्वरूप<br>**प्रा. सिद्धार्थ कुंडलिक इंगोले** | ११-१४ |
| ४ | भारतीय संविधान व लोकशाहीची वाटचाल<br>**प्रा. सौ. सुषमा सु. जाजु** | १५-१८ |
| ५ | भारतीय संविधानातील लोकशाही मूल्ये आणि पंडित जवाहरलाल नेहरू<br>**डॉ. सुभाष एस. गवई**<br>**कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर** | १९-२४ |
| ६ | संत गाडगे महाराजांचे कीर्तनातून समाज प्रबोधन<br>**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार** | २५-२८ |
| ७ | स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक कार्य आणि समाज सुधारकांचे योगदान<br>**डॉ. लक्ष्मीकांत ना. देशपांडे** | २९-३४ |

# ६. संत गाडगे महाराजांचे कीर्तनातून समाज प्रबोधन

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
श्रीमती. सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर.

## प्रास्ताविक

संत गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील थोर संत आणि कर्मयोगी. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील सेनगाव, तालुका दर्यापूर येथे २३ फेब्रुवारी १८७६ला त्यांचा जन्म झाला. सुरुवातीला अठरा वर्षे प्रपंच केल्यानंतर त्यांनी गृहस्थाश्रमाचा परित्याग करून जनसेवा हीच ईश्वरसेवा हे व्रत अंगिकारले आणि लोकोत्तर अशा समाजकार्याला सर्वस्वी वाहून घेतले. समाजातील भोंदूगिरी, देवभोळेपणा, विषमता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा याचा अनुभव त्यांनी घेतला. समाजातील रंजल्यागांजल्यांचे दुःख, दारिद्र्य, दैन्यावस्था पाहून समाजाच्या प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. समाजामध्ये असलेली जातीयता, विषमता आणि देवविषयक चुकीच्या कल्पना दूर करण्यासाठी कीर्तनाचे तंत्र त्यांनी अवलंबिले आणि ग्रामस्वच्छतेबरोबर सुधारणाविषयक विचारांचे धडे त्यांनी समाजमनाला दिले. त्यांच्या सुधारणाविषयक विचार आणि वैज्ञानिक दृष्टीने मानवाच्या कल्याणाचा धडा दिला. त्यांचे समाज कल्याणकारी कार्य मानवजातीला प्रेरणादायी ठरणारे आहे.

## अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य

समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य संत गाडगेबाबा यांनी केले आहे. समाज हा अज्ञान, अंधश्रद्धा यामध्ये गुरफटून गेला होता. अनेक प्रकारच्या देव-देवता, नवस-सायास, पशुहत्या यामध्ये अडकून पडलेल्या समाजाला संत तुकाराम महाराजांप्रमाणे संत गाडगेबाबा यांनी योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य केले. श्राद्ध, सण आणि पोथीनिष्ठा यांचा त्यांनी अव्हेर केला. देवदर्शनासाठी तीर्थाटनाला जाण्याची आवश्यकता नाही हे लोकांना पटवून देण्याचे काम त्यांनी केले. संत तुकाराम महाराज आपल्या अभंगांमध्ये म्हणतात,

"देही असोनिया देव। वृथा फिरतो निर्देव
देव आहे अंतर्यामी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी
नाभी मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरी"१

तीर्थाटनाला जाणे म्हणजे आपला वेळ, श्रम आणि पैसा वाया घालवणे होय. तीर्थाच्या ठिकाणी गेल्यानंतर तो देव आपल्याशी बोलत नाही, आपली विचारपूस करत नाही. आपली जी गैरसोय होते, त्याची त्याला वास्तपुस्त नसते. ज्या देवाला स्वतःची काळजी घेता येत नाही, तो आपले रक्षण कसे करणार? आपल्याला कसा पाहणार? आपल्या इच्छा कशा पूरण करणार? याविषयी जागृती घडवून आणून लोकांचे

मतपरिवर्तन करण्याचे फार मोठे काम आपल्या किर्तनाच्या माध्यमातून संत गाडगे महाराजांनी केले आहे.

मूर्तिपूजेला त्यांनी विरोध दर्शविला आहे. प्रत्येक प्राणिमात्रांमध्ये ईश्वर आहे आणि प्राणिमात्रांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा होय, हा विचार जनसामान्यांच्या मनावर बिंबवण्याचे फार मोठे काम त्यांनी केले. ईश्वरी आराधनेत कर्मकांडांना बाबांनी नाकारले. समाजामध्ये असलेल्या अनावश्यक प्रथा, परंपरा आणि धर्मकल्पना यांना त्यांनी तिलांजली दिली. संत गाडगे महाराज संत तुकारामांचा दाखला देत म्हणतात,

" जनीजनार्दन जनी, संत बोलती वचन।"२

खरा ईश्वर आणि त्याची आराधना एकच, याचे सत्य स्वरूप काय आहे, हे त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणांच्या साहयाने लोकांना पटवून दिले.

**लोकशिक्षकाची भूमिका**

कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा लोकांच्या मनापर्यंत पोहोचवण्याचे काम संत गाडगेबाबा यांनी केले. संत तुकारामाप्रमाणे त्यांची भूमिका ही लोकशिक्षकाची दिसते. आपल्या प्रबोधनाच्या माध्यमातून समाजाच्या हिताचे रक्षण करण्याचे काम त्यांनी केले. ज्ञानाचा दिवा घराघरांमध्ये लावण्याच्या त्यांच्या या कार्याचा प्रभाव आजही समाजमनावर टिकून आहे. शिक्षण हे सामाजिक सुधारणेचे महत्वाचे अंग आहे. शिक्षणामुळेच समाज हा पुढे जाईल, समाजाची प्रगती होऊन अज्ञान, अंधश्रद्धा दूर होईल, जीवनाचा खरा अर्थ लोकांना कळेल, विकासाचा मार्ग कळेल आणि म्हणून शिक्षणाचे महत्त्व जनसामान्यांच्या मनावर बिंबवण्याचे काम त्यांनी केले. एक भाकरी खायची तर अर्धी खावी, कपड्यांवर खर्च कमी करावा पण मुलांना मात्र शिक्षण द्यावे, असा संदेश गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून देतात.

समाजाची नस गाडगेबाबांनी ओळखली होती. समाजाचे प्रश्न त्यांना ज्ञात होते आणि त्यामुळेच हे प्रश्न कसे सोडवता येतील, याचा विचार अनुभवातून आणि चिंतनातून त्यांच्याकडे होता आणि त्यांनी त्याद्वारेच लोकांना योग्य मार्ग दाखवण्याचे काम केले. समाजाविषयी असणारी आस्था त्यामागे होती. समाजाच्या कल्याणासाठी तळमळणारे एक जागृत मन संत गाडगेबाबांच्या ठिकाणी आपल्याला दिसते. आईवडील जसे आपल्या मुलांच्या हिताचा, कल्याणाचा विचार करतात. त्यांच्यासाठी आपले आयुष्य वेचतात. गाडगेबाबा यांची सुद्धा समाजाच्या कल्याणासाठी अशीच तळमळ दिसते. सर्वसामान्यांप्रमाणे संसार न करता संपूर्ण समाजाच्या हिताचा संसार त्यांनी केला. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून विज्ञानप्रसाराचे कार्य त्यांनी केले. लोकांना स्वच्छतेचे धडे दिले. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे ते स्वतः ग्रामस्वच्छतेचे काम करीत असत. येथे सुद्धा संत तुकाराम महाराजांच्या 'तुका म्हणे नाही आले अनुभवा, आधीच मी देवा कैचा नाचू' किंवा 'अनुभवाशिवाय नाही मी बोलत' या वचनांचा प्रत्यय येतो. शिक्षण हे मूठभर लोकांच्या हाती असले तर समाजाची प्रगती होणार नाही, त्यासाठी संपूर्ण समाज हा

शिकून शहाणा झाला पाहिजे याची जाणीव त्यांना होती आणि त्यादृष्टीने त्यांनी केलेले प्रबोधनाचे कार्य हे लोकशिक्षकाच्या भूमिकेतून होते हे आपल्या लक्षात येते.

**गाडगे बाबांचा वैज्ञानिक दृष्टीकोन**

गाडगेबाबांचा अंधश्रद्धा आणि कर्मकांडाला विरोध होता. विज्ञानाचा आधार असलेला बुद्धिवादी दृष्टीकोन त्यांनी लोकांपर्यंत पोहचविला. आपले तत्वज्ञान लोकांना समजेल अशा भाषेमध्ये त्यांनी मांडले. यादृष्टीने लोकांना कळतील अशा प्रकारची उदाहरणे देऊन आपल्या विचारांचा प्रभाव अधिक दृढमूल केला. सत्यनारायणाची पोथी वाचल्याने आपल्या इच्छा पूर्ण होत नाही हे पटवून देण्यासाठी त्यांनी सत्यनारायणाच्या पोथीमधील उदाहरण दिले. साधुवाण्याने सत्यनारायणाचा प्रसाद खाल्ला नाही म्हणून त्याची बोट समुद्रामध्ये बुडाली आणि प्रसाद खाल्ला तर समुद्रातून वर आली, या गोष्टीवर लोकांना ते विचार करायला लावतात. सत्यनारायणाची पूजा केल्यानंतर जर बुडालेली बोट वर येत असेल तर महायुद्धाच्या काळामध्ये बुडालेल्या आगबोटी शोधण्याची आवश्यकता नाही.

समुद्राच्या किनाऱ्यावर सत्यनारायणाची पूजा घालून सर्व आगबोटी वर येऊ शकतात, त्यासाठी सत्यनारायणाची पूजा करणाऱ्या पुरोहितांना समुद्राच्या काठी पाठविले पाहिजे, अशा उपहासगर्भ शैलीमध्ये ते सत्यनारायणाच्या कथेचा समाचार घेतात आणि लोकांना विचार करायला भाग पाडतात. आपल्या कीर्तनामध्ये लोकांना प्रश्न विचारून लोकांना ते कीर्तनामध्ये सहभागी करून घेतात आणि त्यांनाच उत्तरे द्यायला लावून वस्तुस्थितीची जाणीव करून देतात. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी दैवी चमत्कारांना विरोध केला आणि आपले बुद्धीवादी तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवून प्रबोधनाचे कार्य केले आहे.

**पशुहत्या, व्यसनमुक्ती संदर्भात प्रबोधन**

देवाच्या नावावर कोंबड्या-बकऱ्यांची होणारी हत्या कशी चुकीची आहे, याचे प्रबोधन गाडगेबाबा करतात. देवाच्या नावावर आपणच आपले पोट भरतो. आपण लहान लेकरांप्रमाणे त्यांचा सांभाळ करतो आणि त्यांच्याच मानेवर आपण सुरी चालवतो हे कसे अयोग्य आहे आणि संवेदनाशून्य आहे, या संदर्भात ते लोकांना जाग आणतात. ईश्वर हा जीवन देणारा आहे, जीव घेणारा नाही आणि जो हत्या करायला लावतो तो ईश्वर कसा असेल? संत गाडगे बाबा कबीराचा दाखला देत पटवून सांगतात,

"तिरथ जाव काशी जाव चाहे जाव गया।
कबीर कहे कमालकू सबसे बडी दया।।"३

अशापध्दतीने लोकांना शिकवण देत आणि विचार करायला लावून ते त्यांना पशुहत्या थांबविण्याचा संदेश देतात. व्यसनांमुळे प्रगती होत नाही त्याचबरोबर संसारामध्ये कटकटी वाढतात, यासाठी सर्व प्रकारचे व्यसन हे सोडायला हवे.

व्यसनांमुळे दारिद्रय वाढते. व्यसनांपासून दूर राहून शिक्षणावर खर्च करावा. बाप दारू पिऊन येत असेल तर त्याला मार्गावर आणण्यासाठी त्याच्या मुलाने आणि बायकोने त्याचा समाचार घेऊन त्याला मार्गावर आणले पाहिजे, असा सल्लाही ते देत. समाजातील प्रश्न हे अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसन, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, कर्मकांड, देवभोळेपणा यातून निर्माण झालेले आहेत आणि त्यामुळेच लोकांचे संसार सुखाचे होत नाहीत, त्यांची प्रगती नाही, त्याची पुरेपूर कल्पना असल्यामुळेच ते अतिशय तळमळीने लोकांना जाग आणतात, त्यांना कल्याणाचा मार्ग दाखवतात.

कर्ज काढून सोहळे साजरे करू नका, सण साजरे करू नका, तीर्थयात्रा करू नका असा उपदेश गाडगे बाबा लोकांच्या हितासाठी करतात. आपल्या अवतीभवतीचा समाज, त्याची व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा त्यांनी पाहिलेला होता. शेतकरी हा वर्षभर राबराब शेतामध्ये राबतो आणि हाती आलेले पीक हे सावकाराच्या घरामध्ये कर्जरूपाने घालतो. कर्ज काही करता फिटण्याचे नाव घेत नाही आणि या कर्जापायी जमिनी आणि घरसुद्धा गहाण ठेवण्याची वेळ त्यांच्यावर येते. हे सारे समाजामध्ये घडत होते म्हणून लोकशिक्षकाच्या भूमिकेतून त्यांनी समाजाला ज्ञान दिले, व्यवहाराचे गणित समजावून सांगितले, अंधःकारात झोपी गेलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखविला.

## समारोप

महाराष्ट्राला साधुसंतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. संत गाडगे बाबा हे अलीकडच्या काळातील थोर कर्मयोगी संत. समाजातील कर्मकांडे आणि कुप्रथा यांच्याविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. समाज परिवर्तनाच्या चळवळीमध्ये त्यांचे योगदान फार मोठे राहिले आहे. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजावरील या गोष्टींचा प्रभाव कसा दूर होईल त्यादृष्टीने आपले प्रबोधन कार्य त्यांनी अखंडपणे आयुष्यभर चालू ठेवले. ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजमनामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला.

संत गाडगेबाबांनी एकाच वेळी संत आणि समाजसुधारक या भूमिकेतून कार्य केले. मानवजातीचे कल्याणत्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होती. व्यवहाराचे ज्ञान देत स्वावलंबन आणि श्रमाला प्रतिष्ठा त्यांनी मिळवून दिली. स्वच्छतेचे धडे त्यांनी समाजाला दिले. संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज यांच्याप्रमाणे आपल्या किर्तनाच्या माध्यमातून संत गाडगे महाराजांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाचे केलेले कार्य मानवजातीच्या कल्याणासाठी होते.

## संदर्भ टीपा

१. डॉ. किशोर सानप, प्रा.मनोज तायडे, तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व, आवृत्ती पहिली १९९५, मुंबई पृ.क्र.९०
२. डॉ. केशव फाले, वैखरी भाग २, आवृत्ती पहिली २०१२, जळगाव, पृ. क्र. २४
३. तत्रैव पृ.क्र.२७

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana